1) <u>एम्ब्लेम – प्रतीक–चित्र</u>

**प्रतीक–चित्राविषयी –**

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे उपर्युक्त प्रतीक हे संस्कृत भाषेची ज्ञानविज्ञान क्षेत्रातील महत्ता, महत्त्व, विस्तार व प्रभाव दर्शविते. संस्कृत भाषा ही भारताच्या प्राचीन ज्ञानपरंपरेची समृद्ध भाषा होती–आहे. जागतिक वाङ्मयात नोंद झालेला पहिला उपलब्ध प्राचीन दस्तावेज असणारा ऋग्वेद हा अर्थातच संस्कृत भाषेत आहे. अखिल भारतवर्षाला व मानवजातीला ललामभूत अशा प्राचीन ज्ञानभांडाराचे मूळ स्वरूपात संरक्षण व संवर्धन झाले ते फक्त संस्कृतभाषेच्या मौखिक परंपरेनेच! या भूषणभूत परंपरेचे पाईक असणा–या आपल्याला संस्कृत विद्यापीठाच्या रूपाने हा मौलिक ज्ञानवारसा जपण्याचे दायित्व प्राप्त झाले आहे.

हया प्रतीक–चित्राचा प्रत्येक घटक विचारपूर्वक स्थापित केला आहे. मध्यवर्ती असलेली समई असे दर्शविते की, संस्कृत भाषा ही मंदपणे तेवणा–या समईप्रमाणे असून हा प्रकाश शान्त, सात्त्विक, ज्ञानयुक्त व मार्गदर्शक आहे. हा प्रकाश विद्यार्थी, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, अभ्यागत, संस्कृतानुरागी तसेच या विद्यापीठाशी संबंधित सर्वांनाच एकाच वेळेला ज्ञानसाधना करण्यास प्रवृत्त करणारा तर आहेच परंतु संघर्षसमयी मार्गप्रदीप बनून दिशा दाखविणाराही आहे.

पुस्तक हे संस्कृत–ज्ञानभांडाराचे केवळ प्रातिनिधिकरूप आहे! त्याद्वारा विश्वविद्यालयाद्वारे शिकविण्यात येणारी विविध शास्त्रे व आधुनिक युगातील संस्कृतभाषेचा इतर शास्त्रांशी असणारा सहसंबंध दर्शविला जातो.

ही शास्त्रे कोणती ? ती विविध पाकळयांच्या रूपाने दाखविली आहेत. वेद, स्मृती, पुराणे, षड्दर्शने, आर्षकाव्ये, महाकाव्यनाटके, या सर्व प्राचीन शास्त्रकाव्यांबरोबरच आधुनिक युगाचा सहकारी असणा–या संगणकाकरिता अखिल विश्वाने सर्वाधिक ''अचूक'' म्हणून गौरवलेली संस्कृत ही ''संगणकीय भाषा'' म्हणून मान्य आहे. ती प्राचीन भारतातील विज्ञानपरंपरेचा आधुनिक तंत्रज्ञानाशी असलेला समन्वय व संबंध अधोरेखित करणारी भाषा आहे. म्हणूनच ''विज्ञानतंत्रज्ञान'' या विषयांचा समावेशही संस्कृत विद्यापीठाने आपल्या

प्रतीकात औचित्यपूर्वक व कालाची गती लक्षात घेऊन आवर्जून केला आहे. विश्वविद्यालयाचा विद्यार्थी जागतिकीकरणाच्या युगात कोणत्याही प्रकारे मागे राहू नये तसेच पारंपरिक विद्या ग्रहण करीत असताना तिची नाळ आधुनिकतेशी कशाप्रकारे जुळली आहे हे आजच्या विद्यार्थ्यांना समजावे असा यामागचा उद्‌देश आहे.

विश्वविद्यालयाचे ब्रीद असणा—या ''राष्ट्रहिताय संस्कृतम्'' या विचाराशी हा संपूर्ण प्रतीकाचा पट समन्वित आहे. संस्कृत भाषेचा विद्यार्थी असो वा अभ्यासक असो, काम करणारा कर्मचारी असो किंवा केवळ तिच्यावरील अनुरागाने संबंध असणारा अभ्यागत असो त्यांचा मूळ हेतू हा केवळ स्वतः, कुटुंब यांच्यापुरता मर्यादित व स्वार्थी विचार करणारा नसून संपूर्ण समाज, देश, जग व विश्व कवेत घेण्याचा आहे; कुठलीही जात, धर्म, वंश, पंथ, भाषा, संस्कृती, वेष यांचे स्तोम न माजवता संस्कृत भाषा—ज्ञान हे राष्ट्रहितास कसे उपकारक होते हे स्वआचरणातून विदित करणारा आहे. म्हणूनच अखिल राष्ट्र आपले मानून त्यासाठी संस्कृतभाषेच्या माध्यमातून सुसंस्कृतरीत्या सेवा करणे हा आपला धर्म विद्यापीठाने मानला आहे. विद्यापीठाच्या स्थापनेचा उद्‌देश काय? हेतू काय? प्रयोजन काय? हे अतिशय अल्पाक्षरी शैलीत व स्पष्ट शब्दात विद्यापीठाने आपल्या ब्रीदाद्वारे सांगितले आहे. या आपल्या ब्रीदाशी विद्यापीठ कटिबद्ध आहे!

ब्रीदाच्या आजूबाजूला दोन कमलकलिका आहेत. या कलिका उमलण्यासाठी उत्सुक आहेत; फुलण्याच्या प्रतीक्षेत आहेत. या कलिका हे संस्कृतविद्याग्रहणास उत्सुक अशा साधकांचे— विद्यार्थ्यांचे प्रतीक आहे. संस्कृत भाषेचा अभ्यास कोणीही, कोणत्याही वयात करू शकतो; त्याला वयाचे बंधन तर नाहीच परंतु संस्कृतभाषेच्या पूर्वज्ञानाचीही अट नाही. शिकण्यास उत्सुक असा कोणीही या कलिकांप्रमाणेच स्वव्यक्तिमत्त्वावर संस्कृतभाषाज्ञानाद्वारे संस्कार करवून घेऊ शकतो. कारण खरोखरच आपले व्यक्तिमत्त्व सुसंस्कृत बनविणे हे कलिकेचे फुलात रूपांतर होण्यासारखेच आहे.

ब्रीदाभोवतीचे वर्तुळ हे गुरू—शिष्य परंपरा अभिव्यक्त करते. ही परंपरा पुन्हा मूळाकडे जाऊन, तिला पाहून, स्पर्श करून, पूर्वजांच्या अनुभवांचा, शिकवणुकीचा वारसा घेऊन पुढे पुढे जाणारी आहे. विद्यार्थी,

अभ्यासू साधक–प्राध्यापक, व्यासंगी विद्वान, संशोधक–गुरू अशी परंपरा निर्माण करण्याची, वृद्धिंगत करण्याची मोठी जबाबदारी विद्यापीठाची आहे आणि विद्यापीठ ही जबाबदारी समर्थ  व सक्षमपणे पेलू शकते हे सिद्ध करण्याचे काम ही गुरू–शिष्य परंपराच करणार आहे. एकप्रकारे ही परंपराच विद्यापीठाचा आरसा आहे.

---